जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

Lokneta News - लोकनेता न्युज

मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंढे




बुधवार दि.३१ डिसेंबर २०२५ | RNI-MAHMAR/2023/89402 | Email : dnyaneshmofficial@gmail.com | वर्ष : ०३ | अंक : १४१ | किंमत २ रुपये | 7499615933

## ज्ञानेश्वर मुंढे-दैं.लोकनेता चे संपादक

## एक हाडामासाचा, लढाऊ आणि लोकहिताचा आवाज

**लोकशाहीच्या चौथ्या स्तंभात काम करणारे पत्रकार हे केवळ बातम्या छापणारे नसतात, तर समाजाच्या जखमा उघड करणारे, अन्यायाविरुद्ध उभे ठाकणारे आणि जनतेचा आवाज सत्तेच्या दालनात पोहोचवणारे योद्धे असतात. अशाच योद्ध्यांपैकी एक म्हणजे दै. लोकनेता या निर्भीड दैनिकाचे संपादक ज्ञानेश्वर मुंडे.ज्ञानेश्वर मुंढे हे नाव आज सामान्य माणसाच्या हक्कासाठी झटणाऱ्या, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणाऱ्या आणि सत्यासाठी कोणत्याही दबावाला न जुमानणाऱ्या पत्रकारितेचे प्रतीक बनले आहे. ते केवळ संपादक नाहीत, तर हाडामासाचा लढाऊ लोकहितवादी कार्यकर्ता आहेत. लोकहित हीच पत्रकारितेची खरी ओळख आहे.**

दै. लैकनेता चालु करण्यासाठी त्यांनी भरपुर संघर्ष केला आहे. सामान्य कुटुंबात जन्मलेले असून, कोण काय बनण्याचे स्वप्न पाहतो पण सामाजिक परिवर्तन व समाजहितासाठी लढणारे खुपच कमी असतात खरच तुमच काम महान आहे सर. तुमच्या कष्टाचच फलित आज दिसतोय महाराष्ट्र भर एक दर्जेदार पेपर म्हणून दै. लोकनेता समोर येतोय आणखी खुप पुढे जाईल यात दुमत नाही.दै. लोकनेता या दैनिकाच्या माध्यमातून ज्ञानेश्वर मुंढे यांनी नेहमीच शेतकरी, कामगार, कष्टकरी, भटक्या-वंचित समाज, महिला, युवक यांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले. सत्तेच्या चुकांवर बोट ठेवताना त्यांनी कधीही तडजोड केली नाही. प्रशासनातील भ्रष्टाचार, अन्यायकारक निर्णय, दुर्लक्षित प्रश्न यावर निर्भीडपणे प्रहार करणे हीच त्यांची पत्रकारिता आहे.

दबाव, धमक्या तरीही न झुकणारा संपादक...सत्य लिहिताना अनेकदा दबाव, धमक्या, अडचणी येतात. मात्र ज्ञानेश्वर मुंड यांनी कधीही सत्याची वाट सोडली नाही. लोकांचा प्रश्न हा माझा प्रश्न आहे या भूमिकेतून त्यांनी पत्रकारिता केली. त्यामुळेच सामान्य माणूस त्यांना आपला माणूस समजतो.

ग्रामीण भागाचा बुलंद आवाज

ग्रामीण महाराष्ट्रातील प्रश्न, दुर्लक्षित गावांची व्यथा, शेतकऱ्यांचे आत्महत्याग्रस्त प्रश्न, पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण यासारख्या मूलभूत विषयांना त्यांनी सातत्याने वाचा फोडली. दै. लोकनेता हे केवळ वर्तमानपत्र न राहता जनतेचे व्यासपीठ बनले.आजच्या तरुण पत्रकारांसाठी ज्ञानेश्वर मुंडे हे प्रेरणास्थान आहेत. प्रसिद्धी, पैशापेक्षा लोकहित महत्त्वाचे मानणारी पत्रकारिता अजून जिवंत आहे, याचा विश्वास ते निर्माण करतात.ज्ञानेश्वर मुंढे हे नाव म्हणजे निर्भीड पत्रकारिता, लोकहिताची लढाई आणि सत्याशी निष्ठा. दै. लोकनेता च्या माध्यमातून त्यांनी समाजाला आरसा दाखवण्याचे काम केले आहे. अशा हाडामासाच्या, लढाऊ आणि लोकहितवादी संपादकाला वाढदिवसाच्या कोटी कोटि दै. लोकनेता परिवारा कडून शुभेच्छा......

शब्दाकन
ॲड.विजयकुमार पवार विधी सल्लागार दै. लोकनेता..



## निर्भीड पत्रकारितेचा बुलंद कंठ

### दै.लोकनेताचे संपादक ज्ञानेश्वर मुंढे यांना लोकनेता परिवाराच्या शुभेच्छा

**लोकशाहीच्या चौथ्या स्तंभातील पत्रकार हे केवळ बातम्या देणारे नसून समाजाचे सजग प्रहरी,अन्यायाविरुद्ध लढणारे रणशूर योद्धे आणि सर्वसामान्यांचा आवाज सत्तेपर्यंत पोहोचवणारे लोकशाहीचे खरे आधारस्तंभ असतात. अशाच निर्भीड, ठाम आणि लोकहितवादी पत्रकारितेचे प्रतिनिधी म्हणजे दै. लोकनेता या लोकप्रिय दैनिकाचे संपादक ज्ञानेश्वर मुंढे होत.**

लोकहिताला केंद्रस्थानी ठेवलेली पत्रकारिता

ज्ञानेश्वर मुंढे यांनी पत्रकारितेला कधीही केवळ व्यवसाय मानले नाही; त्यांनी तिला लोकसेवेचे प्रभावी माध्यम बनवले. शेतकरी, कष्टकरी, कामगार, भटक्या-वंचित समाज, महिला व युवक यांच्या ज्वलंत प्रश्नांना दै. लोकनेता च्या माध्यमातून सातत्याने प्राधान्य देण्यात आले.

सत्तेविरुद्ध ठाम व निर्भीड भूमिका

प्रशासनातील भ्रष्टाचार, चुकीचे निर्णय आणि अन्यायकारक धोरणांवर त्यांनी कोणतीही तडजोड न करता स्पष्ट व निर्भय भूमिका घेतली. सत्य मांडताना येणारे दबाव, धमक्या व अडचणी असूनही त्यांनी कधीही सत्याची वाट सोडली नाही, हीच त्यांच्या पत्रकारितेची खरी ओळख आहे.

ग्रामीण महाराष्ट्राचा ठाम आणि विश्वासार्ह आवाज

ग्रामीण भागातील पाणीटंचाई, रस्त्यांची दुरवस्था, आरोग्य व शिक्षणाचे प्रश्न तसेच शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसारख्या गंभीर विषयांना त्यांनी सातत्याने वाचा फोडली. ग्रामीण महाराष्ट्राचा खरा आरसा दै. लोकनेता ने समाजासमोर मांडला, हे त्यांच्या कार्याचे मोठे योगदान मानले जाते.

तरुण पत्रकारांसाठी प्रेरणादायी नेतृत्व

आजच्या स्पर्धात्मक आणि प्रसिद्धीप्रधान युगातही लोकहिताला सर्वोच्च स्थान देणारी पत्रकारिता जिवंत आहे, याचा विश्वास ज्ञानेश्वर मुंढे यांनी निर्माण केला आहे. त्यामुळेच ते आजच्या तरुण पत्रकारांसाठी मार्गदर्शक व प्रेरणास्थान ठरले आहेत.

शुभेच्छांचा वर्षाव

दै. लोकनेता चे संपादक ज्ञानेश्वर मुंढे यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळ्याच्या निमित्ताने लोकनेता परिवारासह राज्यभरातील पत्रकार बांधवांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्यांच्या निर्भीड पत्रकारितेचा गौरव करत सर्व स्तरांतून कौतुक व्यक्त केले जात आहे.

निर्भीड पत्रकारिता, लोकहिताची निष्ठा आणि सत्याशी अखंड बांधिलकी – हेच ज्ञानेश्वर मुंढे यांचे खरे परिचयपत्र आहे.

दै. लोकनेता परिवाराकडून त्यांना आरोग्यसंपन्न, दीर्घायुष्य आणि अधिक जोमाने लोकसेवेचे कार्य घडो, अशा मनःपूर्वक शुभेच्छा!



अण्णासाहेब साबळे (M.A. MCJ)
लोकशाही पत्रकार संघ – बीड जिल्हा उपाध्यक्ष जागतिक लोकवार्ता (डिजिटल) / युट्यूब चैनल मुख्य संपादक, दै. लोकनेता–सहसंपादक,आष्टी



# नांदेड वाघाळा महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक विविध बाबींवरील निर्बंध आदेश निर्गमित

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । अनिल पाटील तेलंग**

राज्य निवडणूक आयोगाकडून नांदेड वाघाळा महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीची दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी घोषणा केली असून घोषणेच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे. नांदेड जिल्ह्यात महापालिका सार्वत्रिक निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोणातून नांदेडचे जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये अधिकाराचा वापर करुन विविध बाबींवर निर्बंध आदेश निर्गमीत केले आहेत.




निवडणूक कालावधीत विश्रामगृह वापरावरील निर्बंध

शासकीय व निवडणूकीच्या कामावर असलेले अधिकारी व कर्मचारी यांच्या व्यतीरिक्त, इतर कोणत्याही व्यक्तीस महानगरपालिका मतदार संघ कार्यक्षेत्रासह नांदेड जिल्ह्यातील सर्व शासकीय व निमशासकीय विश्रामगृहात थांबण्यासाठी संबंधित खात्याने दिलेला अधिकृत परवाना असल्याशिवाय किंवा सक्षम अधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीशिवाय प्रवेश करण्यास प्रतिबंधीत करण्यात आले आहे.

ध्वनीक्षेपक, ध्वनिवर्धकाचा वापर

कोणतीही व्यक्ती, संस्था, पक्ष व पक्षाचे कार्यकर्ते यांना ध्वनीक्षेपक व ध्वनिवर्धकाचा वापर सक्षम प्रधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीशिवाय करता येणार नाही. फिरत्या वाहनांवर ध्वनिक्षेपक व ध्वनिर्धकाचा वापर करता येणार नाही. महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्रमांक ध्वनीप्र २००९/प्र.क्र.१२/०८/ ता.क.१, दिनांक ३१ जुलै, २०१३ नुसार ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धकाचा वापर ध्वनि प्रदुषणाची पातळी विहित मर्यादेत राखून करावी. ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धकाचा वापर सकाळी ६ वाजेपुर्वी आणि रात्री. १० वाजेनंतर करता येणार नाही.

कार्यालये, विश्रामगृहे परिसरातील निर्बंध

नांदेड वाघाळा महानगरपालिका कार्यक्षेत्राचे हद्दीपावतो, सर्व शासकीय, निमशासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थाची कार्यालये, विश्रामगृहे इत्यादी परिसरात कोणत्याही प्रकारची मिरवणूक, मोर्चा काढणे, सभा घेणे, उपोषण करणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणने, कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यावर निर्बंध राहतील.

शासकीय वाहनाच्या गैरवापरास प्रतिबंध

निवडणूकीचे कालावधीत नांदेड वाघाळा महानगरपालिका मतदार संघ कार्यक्षेत्रासह नांदेड जिल्ह्यात नांदेड वाघाळा महानगरपालिका हद्दीपावेतो निवडणूक कालावधीत कोणत्याही वाहनांच्या ताफ्यामध्ये तीन पेक्षा जास्त मोटारगाडया अथवा वाहने (उर्री/तशहळलश्रशी) वापरण्यास या आदेशाव्दारे प्रतिबंधीत करण्यात आले आहे.

वाहनांवर पक्ष प्रचाराचे कापडी फलके, झेंडे लावणे इत्यादी बाबीस काही प्रतिबंध

फिरत्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजुला विंड स्क्रीन ग्लासच्या पुढे राहणार नाही आणि तो त्या वाहनाच्या टपापासून २ फुट उंची पेक्षा जास्त राहणार नाही. प्रचाराच्या फिरत्या वाहनावर कापडी फलक वाहन चालकाच्या आसनामागे वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजुनेच लावण्यात यावा. इतर कोणत्याही बाजूस तो लावता येणार नाही. फिरत्या वाहनावर लावावयाचा पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी फलक संबंधीत पक्षाचे जिल्हाध्यक्ष, उमेदवार व उमेदवाराचे निवडणूक प्रतिनिधी यांच्या वाहना व्यतिरीक्त इतर कोणत्याही वाहनावर लावता येणार नाही.

सार्वजनिक ठिकाणी तात्पुरती पक्ष कार्यालय स्थापन करण्यास निर्बंध

नांदेड वाघाळा महानगरपालिका मतदार संघ कार्यक्षेत्र पावेतो निवडणूकीचे कालावधीत धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणाच्या जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यास प्रतिबंधीत करण्यात आले आहे.

सार्वजनिक ठिकाणी पक्षांचे चित्रे, चिन्हांचे कापडी फलके, भाषण देण्याबाबतचे निर्बंध

निवडणूक कालावधीत सार्वजनिक ठिकाणी पक्षांचे चित्रे, चिन्हांचे कापडी फलके, सार्वजनिक ठिकाणी भाषण देण्यास प्रतिबंधीत करण्यात आले आहे.

शासकीय, सार्वजनिक मालमत्तेची विरुपता करण्यास निर्बंध

निवडणूक कालावधीत शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक मालमत्तेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपात विरुपता करण्यास प्रतिबंधीत करण्यात आले आहे.

शस्त्र परवानाधारकाकडील शस्त्रास्त्रे वाहून नेण्यावर बंदी

निवडणूकीचे कालावधीत शासकीय कर्तव्य पार पाडणाऱ्या अधिकारी व कर्मचारी, बँक सुरक्षा गार्ड यांचे व्यतिरिक्त इतर सर्व परवाना धारकास परवान्यातील शस्त्रास्त्रे बाळगण्यास व वाहून नेण्यास या आदेशान्वये बंदी घालण्यात आली आहे.

वरील सर्व आदेश नांदेड जिल्ह्यातील नांदेड वाघाळा महानगरपालिका मतदारसंघ कार्यक्षेत्राच्या हद्दीपावेतो आदेश निर्गमीत झाल्याचा दिनांक १५ डिसेंबर २०२५ पासून १६ जानेवारी २०२६ रोजी मध्यरात्री पर्यंत अंमलात राहतील.

नामनिर्देशनपत्र दाखल करताना अवलंब करावयाची कार्यपद्धत

नांदेड जिल्ह्यात नांदेड वाघाळा महानगरपालिका निवडणूक कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस कार्यालयाच्या १०० मी. च्या बाहेर वाहने व मिरवणूक थांबवावी. तसेच वाहनांच्या ताफ्यामध्ये तीन पेक्षा जास्त मोटारगाड्या/वाहनांना तसेच नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळेस निवडणूक निर्णय अधिकारी यांचे दालनात उमेदवारासोबत तीन पेक्षा जास्त व्यक्तीनी तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक/सभा घेणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे/ वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणने आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करणेस प्रतिबंधीत करण्यात आले आहे.

हा आदेश नांदेड जिल्हयाच्या नांदेड वाघाळा महानगरपालिका निवडणूकीच्या अनुषंगाने संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाच्या हद्दी पावेतो २३ डिसेंबर २०२५ चे ६ वाजेपासून ते ३ जानेवारी २०२६ चे मध्यरात्री पर्यंत अंमलात राहील.

# उदगीरचे विद्यार्थी देशपातळीवर घडवण्यासाठी क्रीडा संस्कृतीला बळ देणार–आ.संजय बनसोडे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर (एल पी उगिले)**

आपल्या ग्रामीण भागातील खेळाडू देशपातळीवर आपले प्रतिनिधित्व करून स्वतःचे व आपल्या भागाचे नाव करावे, यासाठी उदगीर मतदार संघातील खेळाडूंना बळ देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे मत माजी क्रीडामंत्री तथा उदगीर जळकोट विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.ते उदगीर शहरातील टाइम्स पब्लिक स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी बोलत होते.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रदीप पेन्सलवार हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून उदगीरच्या नूतन नगराध्यक्षा सौ. स्वाती हुडे, उद्योजक सतीश बेद्रे, संस्थेचे सचिव विजयकुमार कप्पिकेरे, कोषाध्यक्ष सौ. मंगल कप्पिकेरे, मलकापूरचे सरपंच गुरुनाथ बिरादार , प्राचार्य अभिजीत नळगिरकर, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, कार्याध्यक्ष शशिकांत बनसोडे, माजी उपसभापती बाळासाहेब मरलापल्ले, नगरसेवक बाळासाहेब पाटोदे, नगरसेवक राजकुमार हुडगे, निकिता अंबरखाने, अबरार पठाण, सुनिल केंद्रे, मुकेश भालेराव, पालक प्रतिनिधी कुणाल बागबंदे, संग्राम भिंगोले, जयश्री कवठाळे, डॉ. ज्ञानोबा मुंडे, संदीप हुडे, जगदीश बाहेती, रोहित कप्पीकेरे, गौरी जगताप, आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार संजय बनसोडे यांनी, १९९६ पासुन संस्थेची स्थापना होवून आजपर्यंतच्या वाटचीलीचा आढावा सांगितला. या संस्थेचे विद्यार्थी देशभरात विविध पदावर कार्यरत असुन देशसेवेसाठी योगदान देत आहेत तर अनेक विद्यार्थी हे विविध क्रीडा प्रकारात राज्यपातळीवर आपला नावलौकिक वाढवला आहे. इतरही विद्यार्थी विविध क्रीडा प्रकारात उत्तम खेळाडु घडावेत म्हणून उदगीर शहरात जिल्हा परिषदेच्या मैदानावर १५ कोटीचे क्रीडा संकुल उभारत आहे. त्याचबरोबर सिंगापूरच्या धर्तीवर उदगीर शहरामध्ये ६ कोटीचे उद्यान विकसित करत आहे. याचाही फायदा या भागातील नागरीकांना होणार असल्याचे आ.संजय बनसोडे यांनी सांगितले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन बबिता मसगल्ले व श्रेया हुडगे यांनी केले.यावेळी विद्यार्थी, पालक व शिक्षक उपस्थित होते.

# ईट जिल्हा परिषद गटातून जनतेच्या आग्रहास्तव, संभाजी ब्रिगेड कडून कार्तिकी हनुमान हुंबे मैदानात उतरणार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भूम । रविंद्र लोमटे**

आगामी जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका लवकर जाहीर होण्याची शक्यता आहे. ईट जिल्हा परिषद गट हा सर्वसाधारण महिलेसाठी राखीव आहे. यामध्ये संभाजी ब्रिगेडचे भूम तालुका अध्यक्ष हनुमान हुंबे यांचा सामाजिक कार्याचा लेखा जोका पाहता ईट जिल्हा परिषद गटा मधील गटातील नागरिकांच्या आग्रहास्तव हनुमान हुंबे यांच्या सुविधा पत्नी कार्तिकी हनुमान हुंबे या निवडणुकीच्या मैदानात उतरणार असल्याची चर्चा नागरिकांना मध्ये होताना दिसत आहे.हनुमान हुंबे हे गेल्या अनेक वर्षापासून संभाजी ब्रिगेड च्या माध्यमातून सामाजिक धार्मिक व विविध राजकीय सामाजिक आंदोलनामध्ये सहभागी राहून ईट सर्कल सह तालुक्यात सतत चर्चेत असलेले हे एक नाव आहे. तसेच २०१८ मध्ये धनगर समाजाला एसटीमधून आरक्षण मिळावा यासाठी आंदोलन केल्याने त्यांच्या कारवाई होऊन सहा दिवसाची झेल झाली होती. तसेच या भागामध्ये मराठा आंदोलक म्हणून त्यांची ओळख आहे तर ते विविध जाती–धर्माच्या कार्यक्रमाला उपस्थित राहून त्यांच्या सामाजिक आंदोलनाला पाठिंबा देऊन सहभाग नोंदवतात.



यामध्ये मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण आंदोलनामध्ये पूर्णवेळ सक्रिय होते. इंदन दरवाढी विरोधात लक्षणीय धरणे आंदोलन शेतकऱ्यांच्या विविध मागण्याच्या अनुषंगाने आंदोलन करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असणारे हनुमान हुंबे संभाजी ब्रिगेड कडून सुविधा पत्नी कार्तिकी हनुमान हुंबे यांना निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहे.कार्तिकी हुंबे यांना संभाजी ब्रिगेड कडून तिकीट मिळावा यासाठी ईट गटामधून त्यांच्या नावाची शिफारस देखील होत आहे.ईट गटा मध्ये हुंबे यांच्या नावाची चर्चा होत असल्याने राजकीय हालचालींना वेग आला आहे.

# राज्यराणी’चा विस्तार आदिलाबादपर्यंत करावा अशी मागणी प्रवाशांकडून

लोकनेता न्यूज नेटवर्क

**किनवट । शेख शौकत**

नांदेड ते मुंबई धावणाऱ्या राज्यराणी’ एक्स्प्रेस तसेच तपोवन रेल्वे गाडीचा विस्तार आदिलाबादपर्यंत करावा, अशी मागणी रेल्वे प्रवाशांकडून होत आहे. मात्र, या मागण्या अजूनही पूर्ण झाल्या नाहीत.

तर नांदेड येथून रात्री १० वाजता मुंबईकरिता राज्यराणी एक्स्प्रेस सुटते. या रेल्वे गाडीचा विस्तार आदिलाबादपर्यंत झाला आदिलाबाद, किनवट व त्या पुढील रेल्वेस्थानकांवरुन मुंबई येथे जाणाऱ्या व मुंबई येथून येणाऱ्या प्रवाशांच्या सोयीचे होणार आहे. काझीपेठ ते मुंबई ही साप्ताहिक गाडी रद्दच आहे. सदर रेल्वे गाडीची फेरी पूर्ववत सुरू झाली तर तेही प्रवाशांच्या सोयीचे होणार आहे. या रेल्वे मार्गावरील रेल्वे विषयक प्रलंबित मागण्यांकडे रेल्वे विभागाने



लक्ष द्यावे. तसेच आदिलाबाद व हिंगोलीच्या खासदारांनी हा प्रश्न लावून धरावा, अशी मागणीही रेल्वे प्रवाशांकडून होत आहे. सदर मागणीची दखल घेतल्यास रेल्वे प्रवास अजून सुकर होईल, असे प्रवाशांचे म्हणणे आहे.

# येडूर (बु.) ग्रामपंचायतीत विकासकामांत मोठा गैरव्यवहार; नागरिकांकडून सखोल चौकशीची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलुर । संतोष चिद्रावार लोणीकर**

देगलुर तालुक्यातील येडूर (बु.) येथील ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या विविध विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता, निधीचा अपहार व कागदोपत्री कामे दाखवून प्रत्यक्षात काम न झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून याबाबत नागरिकांनी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अधिकृत तक्रार दाखल केली आहे. ग्रामपंचायतीच्या नोंदींमध्ये तब्बल १५ सीसी नाल्यांचे काम पूर्ण झाल्याचे दाखवण्यात आले आहे, मात्र प्रत्यक्षात गावात केवळ ५ ते ६ नाल्यांचेच अस्तित्व दिसून येत आहे. शाळेसाठी दाखवण्यात आलेले स्वच्छालयाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून ते वापरण्यायोग्य नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. तसेच ग्रामपंचायतीत संगणक खरेदी झाल्याचे कागदोपत्री दाखवण्यात आले, परंतु प्रत्यक्षात कार्यालयात कोणताही संगणक उपलब्ध नाही. कचराकुंड्या, दिवाबत्ती व्यवस्था, सफाई व घनकचरा व्यवस्थापन याबाबतही अनेक वेळा खर्च दाखवण्यात आला असून प्रत्यक्षात ही कामे कधीच झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. सफाईचे काम कागदोपत्री चार वेळा दाखवण्यात आले असताना प्रत्यक्षात एकदाही सफाई करण्यात आलेली नाही. घनकचरा व्यवस्थापनाचे काम तीन वेळा दाखवण्यात आले असून अंगणवाडीसाठी साहित्य खरेदी दाखवण्यात आली आहे, मात्र हे साहित्य प्रत्यक्षात उपलब्ध नाही. विशेष बाब म्हणजे, ‘ग्राम स्वराज्य’ पवर पावत्या अपलोड करून कामे झाल्याचे दर्शवण्यात आले आहेत, परंतु गावात त्या कामांचा कोणताही ठोस पुरावा आढळून येत नाही. यामुळे शासकीय निधीचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर व फसवणूक झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी व अपहार झालेला निधी ग्रामपंचायतीकडून परत वसूल करावा, अशी मागणी येडूर (बु.) येथील नागरिकांनी केली आहे.

याबाबत माधव सुभाष पाटील, सचिन गोविंदराव शेरीकर, गणेश पंढरीनाथ शिंदे, दत्तात्रय भरत बिरादार व बालाजी लक्ष्मण येरनवाड यांनी गटविकास अधिकारी, जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार सादर केली आहे.

या तक्रारीची दखल घेऊन प्रशासनाकडून कोणती कारवाई होते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# आमदार जितेश अंतापूरकर यांच्या वाढदिवसा निमित्त येरगी येथे शैक्षणिक साहित्य वाटप

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । संतोष चिद्रावार लोणीकर**

देगलूर बिलोली विधानसभा मतदार संघाचे आमदार जितेश अंतापूरकर यांच्या वाढदिवसानिमित्त देगलूर तालुक्यातील चालुक्यकालीन ऐतिहासिक नगरी येरगी येथे जिल्हा परिषद शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.



येरगी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे सदरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक नागोराव चव्हाण हे होते तर प्रमुख पाहुणे व आयोजक संरपच संतोष पाटील येरगीकर हे होते. कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य अशोक वाघमारे, ग्रामपंचायत सदस्य विश्वनाथ बागेवार, ग्रामपंचायत सदस्य अशोक बरसमवार, शालेय शिक्षण समिती सदस्य रमेश गटावार, गजानन चेंडके, उमाकांत कालींगवार आदी उपस्थित होते.सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष पाटील, इरवंत कालिंगवार, माधव ईज्जरवार, मल्लिकार्जुन मठपती ग्राम पंचायत सदस्य आदींनी. परिश्रम केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष पाटील येरगीकर यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन नागोराव चव्हाण यांनी केले.

# वर्चस्व ग्रुप भिगवण यांच्याकडून ऊसतोड महिलांना साडी वाटप

लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । प्रविण पिसे**

इंदापूर तालुक्यातील भिगवण येथील वर्चस्व ग्रुप हा नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असून त्यांनी दरवर्षी प्रमाणे यंदाही सलग ५ व्या वर्षी ऊसतोड कामगार महिलांना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुतावस्ती येथील शाळेत साडी वाटप,लहान मुलांना कपडे वाटप तसेच विद्यार्थी यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले



कार्यक्रमासाठी भरणे प्रतिष्ठानच्या अनुष्का ताई भरणे भावी जिल्हा परिषद सदस्य ऍड पुजा ताई घोलप तेज पृथ्वी संस्थापक अध्यक्ष अनिता ताई खरात नगरसेवक प्रशांत मामा उंबरे नगरसेवक शुभम भैय्या पवार तंटामुक्ती अध्यक्ष दशरथ आबा भोसले डायमंड उद्योग समुहाचे संस्थापक अध्यक्ष अमोल दादा कोंडके पैलवान ग्रुप बारामती अध्यक्ष पै ओंकार भाऊ महाडिक माऊली पाटोळे उपस्थित होते.यावेळी सर्वांनी वर्चस्व ग्रुप करत असलेल्या कार्याचा आपल्या भाषणात गुणगौरव करून खुप कौतुक केले या कार्यक्रमाचे आयोजन वर्चस्व ग्रुप चे संस्थापक अध्यक्ष संतोष भाऊ कुताळ कार्याध्यक्ष विशाल भाऊ शिंदे गणेश कुताळ दिपक कुताळ सचिन कुताळ आदी ग्रुपचे सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुर्यवंशी मॅडम व लोहार मॅडमयांनी केले तर गडकर मॅडम यांनी आभार मानले.

# तुंगी (बु) जिल्हा परीषद शालेय समिति अध्यक्षपदी संतोष जाधव यांची सहाव्यांदा निवड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**जिवन जाधव । औसा**

औसा तालुक्यातील जिल्हा .परीषद .तुंगी(बु) शाळेच्या शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी संतोष जाधव तर उपाध्यक्षपदी श्री.सुनील पवार यांची सलग सहाव्यांदा पालकांच्या व ग्रामस्थांच्या वतीने निवड करण्यात आली ,

आज दि.३०/१२/२०२५ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तुंगी (बु.) शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीची पालक सभेमधून पुनर्रचना करण्यात आली.यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचा कार्यकाळ संपलेले अध्यक्ष .संतोष जाधव , उपाध्यक्ष .सुनिल पवार यांची सलग सहाव्यांदा शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली*.

पालक सभेचे अध्यक्ष म्हणून गावातील सेवानिवृत्त शिक्षक.माधव सूर्यवंशी यांची उपस्थित होती ,तर प्रमुख अतिथी म्हणून गावचे उपसरपंच.बाजीराव विश्वनाथ जाधव उपस्थित होते सर्वप्रथम शालेय व्यवस्थापन समितीचे सचिव श्री.चव्हाण बी.के.मुख्याध्यापक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तुंगी (बु) यांनी शालेय व्यवस्थापन समितीच्या



पुनर्रचनेच्या शासन आदेशाचे वाचन पालक व सभेसमोर केले शालेय व्यवस्थापन समिती पुनर्रचना नियम,अटी व कार्य याबाबत सविस्तर चर्चा घडवून आणली.*यावेळी सर्वप्रथम संवर्ग निहाय व इयत्ता निहाय सुचक व अनुमोदक यांच्या वतीने व सर्वांच्या सहमतीने *पालकामधून .संतोष दिगंबर जाधव,.सुनिल दत्तू पवार,.अमोल राम सूर्यवंशी ,.आदीनाथ जालिंदर कावळे,श्रीम.अमरजा किशोर ढोक,श्रीम.मनिषा हणमंत चव्हाण,श्री.जयश्री निळकंठ पांचाळ,श्रीम.रेणूका महेश घोगरे,श्रीम इरफाना खलील शेख यांची पालक सदस्य म्हणून निवड करण्यात आली.यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे
तज्ञ सदस्य म्हणून सर्वानुमते श्री.माधव गणपती सूर्यवंशी, सेवानिवृत्त शिक्षक यांची निवड करण्यात आली तर स्थानिक प्राधिकरण सदस्य म्हणून ग्रामपंचायतीने दिलेले सदस्य .बाजीराव विष्णू जाधव यांची समितीवर निवड करण्यात आली.शिक्षक सभेमधून शिक्षक प्रतिनिधी म्हणून .संजय जगताप सर यांची निवड करण्यात आली तर स्विकृत सदस्य म्हणून कु.प्राजक्ता विजय पांचाळ व चि.अरहान युसुफ पटेल या दोन विद्यार्थ्यांची विद्यार्थ्यांकडून निवड करण्यात आली.

गेली ११ वर्षे अत्यंत समर्पित भाव ठेवून शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष जाधव व उपाध्यक्ष पद सुनिल पवार यानी यांची पुनश्च एकदा सलग सहाव्यांदा सर्वानुमते जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तुंगी (बु) शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली.या पालक सभेचे प्रास्ताविक.संजय विभूते सर यांनी केले तर उपस्थितांना मार्गदर्शन .संतोष जाधव,.भैरवनाथ चव्हाण,.संजय जगताप,माधव सूर्यवंशी यांनी केले तर सर्वांचे आभार श्रीम.शिला चंदनकेरे मॅडम यांनी मानले.

या पालक सभेच्या व शालेय व्यवस्थापन समितीच्या पुनर्रचनेच्या यशस्वीतेसाठी शाळेचे शिक्षक .शेषेराव कबाडे,.सत्यवान कांबळे,.लहुराज उस्तुरे,.राजकुमार झिंगाडे,.किसन विभूते श्रीम.तानुबाई नाथजोगी,श्रीम.छाया फुलवरे यांनी परिश्रम घेतले*यावेळी विद्यार्थी शाळेतील मुख्याध्यापक ,शिक्षक ,तुंगी ग्रामस्थ उपस्थीत होते

# प्राचार्य श्री पी.सी.पाटीलसर यांचा सेवापूर्ती सत्कार संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**औसा । महेश कोळी**

द. २९ डिसेंबर २०२५ रोजी श्री रामनाथ मा. व उच्च माध्यमिक विद्यालय आलमला येथील प्राचार्य श्री पी.सी.पाटील हे आपल्या ३५ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले, त्यामुळे शाळेमध्ये त्यांच्या सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. रामनाथ शिक्षण संस्थेचे जेष्ठ संचालक प्रा. जी.एम. धाराशिवे यांच्या शुभहस्ते हा सत्कार संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष ॲड उमाशंकर पाटील हे होते,तर प्रमुख अतिथी म्हणून आलमला केंद्राचे केंद्रप्रमुख श्री भागवतजी जगताप साहेब विस्तार अधिकारी श्री हमीद शेख उपस्थित होते. तर प्रमुख उपस्थितीमध्ये वि.का सोसायटीचे चेअरमन श्री विश्वनाथ बिराजदार श्री सुरेंद्रजी पो.पाटील, विश्वेश्वरय्या पॉलिटेक्निकचे प्राचार्य श्री प्रशांत धाराशिवे, सरपंच श्री विकास




वाघमारे, हे उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दीप प्रजनन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली,त्यानंतर पाचवीच्या विद्यार्थीनींनी सुंदर स्वागत गीत सादर केले. त्यानंतर सर्वच मान्यवरांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. सत्कारानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव श्री प्रभाकर कापसे सर यांनी मांडले, विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून कु. अंबिका खिचडे या विद्यार्थिनींनी आपले विचार मांडले तसेच माजी विद्यार्थी अण्णाराव वाघमारे यांनीही सरांबद्दलचे गौरव उद्गार मांडले, शिक्षक प्रतिनिधी म्हणून विद्यालयातील सहशिक्षक डॉ. शरण धाराशिवे यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या व त्या नंतर सत्कारमूर्ती व त्यांच्या पत्नी सेवानिवृत्त प्राचार्या सौअनिता पाटील मॅडम यांचा संस्थेच्या व शिक्षक कर्मचाऱ्यांच्या वतीने भर पेहराव आहेर,शाल, पुष्पहार व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. सत्कारमूर्तीचे चिरंजीव इंजि.अनिकेत पाटील यांनीही आपल्या वडिलांप्रती भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी श्री भागवत जगताप साहेब यांनीही पी.सी.पाटील सरांच्या कार्यावर प्रकाश टाकून त्यांना भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. त्यानंतर ॲड उमाशंकर पाटील यांनी अध्यक्षीय समारोप केला. याप्रसंगी रामनाथ शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष शिवाजीराव अंबुलगे, कोषाध्यक्ष चनबसप्पा निलंगेकर, संचालक मन्मथप्पा धाराशिवे,विरनाथ हुरदळे, शिवसांब हुरदळे, पंचक्रोशीतील ग्रामस्थ,महिला भगिनी, विद्यार्थी पालक, माजी विद्यार्थी, पाटील परिवारातील सदस्य,नातलग मित्रपरिवार आणि आलमला घटक शाळेतील शिक्षक विद्यालयातील सर्व शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भास्कर सूर्यवंशी यांनी केले तर आभार प्रा. मुळे पी.के. यांनी मांडले.

# कवळे गुरुजी यांच्या तीन कारखान्यात तीन लाख मेट्रिक टन ऊस गाळप.



लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । किशनराव गायकवाड**

व्हीपीके उद्योग समूहाचे अध्यक्ष शेतकरी नेते उद्योजक मारोतराव कवळे गुरुजी, सीईओ संदीप पाटील कवळे यांच्या मार्गदर्शनाखाली दि २९ डिसेंबर पर्यंत व्हिपीके उद्योग समूहातील व्हीपीके कारखाना सिंधी, डॉ शंकरराव चव्हाण कारखाना कुसुमनगर, एम व्हि के कारखाना कुसुमनगर, या तीनही कारखान्याचे ऊस गाळप ३००९४१ मॅट्रिक टन झाले असल्याची माहिती कारखान्याचे सीईओ संदीप पाटील कवळे यांनी दिली आहे. ऊसाचे चांगले गाळप झाल्याबद्दल अधिकारी, कर्मचारी, कामगार, वाहतूक ठेकेदार, शेतकरी या सर्वांच्या सांधिक कामगिरीने सदरील यश संपादन झाले, असे चेअरमन मारोतराव कवळे गुरुजी यांनी सांगितले आहे.

# शेतकऱ्यांच्या लेकरांवर ३५३ चा गुन्हा दाखल करणाऱ्या भ्रष्टाचाराने बरबटलेल्या स्थानिक पुढारी आणि कामचुकार प्रशासनाचा जाहीर निषेध!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन ज्ञानेश्वर जगताप**

जिल्हा सचिव आम आदमी पार्टी जालना. भ्रष्टाचाराने बरबटलेले अवैध मार्गाने निवडुण आलेले स्थानिक पुढारी आणि स्थानिक कामचुकार प्रशासन त्यांनीच निर्माण केलेल्या प्रश्नांबाबत शेतकऱ्यांचे म्हणने जर ऐकून घेत नसेल आणि शेतकरी पुत्र जर शांततेच्या लोकशाहीच्या मार्गाने उपोषण आंदोलन करत असतील तर हा त्यांचा गुन्हा आहे काय ?

भोकरदन येथे शेतकऱ्यांच्या लेकरांनी आंदोलन केले म्हणून प्रशासनातर्फे ३५३ शासकीय कामात अडथळा आणल्या बाबत सुमारे डझनभर शेतकरी पुत्रांवर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. नारायण लोखंडे आणि विकास जाधव या शेतकरी पुत्रांनी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कामचुकार प्रशासनाच्या अन्याया विरुद्ध, नाकर्तेपणा विरुद्ध, भ्रष्टाचार व हुकूमशाही विरुद्ध आमरण उपोषण सुरू केले होते. पाच दिवस आमरण उपोषण करूनही प्रशासन व स्थानिक अनपढ हप्तेखोर पुढारी मानायला तयार नव्हते. तात्काळ अंमलबजावणी करण्यासारख्या अनेक बाबी असताना कागदी घोडे नाचवण्या व्यतिरिक्त तहसीलदारांनी कोणतीही ठोस भूमिका घेतली नाही. जनतेमध्ये दुजाभाव करणाऱ्या मग्रुर लोकप्रतिनिधींना शेतकऱ्यांच्या प्रश्नाशी काही देणे घेणे नाही. शेतकऱ्यांच्या होणाऱ्या पिळवणुक व अन्याया बाबत जाब विचारण्याची आवश्यकता असताना स्थानिक पुढाऱ्यांनी बघ्याची भूमीका घेतली. स्थानिक करोडोपती लोकप्रतिनिधी गरीब शेतकऱ्यांच्या बाबतीत कोणतीही जबाबदारी घेण्यास तयार नाहीत. मग शेतकऱ्यांच्या आडवुन ठेवलेल्या कामाबाबत पंचायत समितीच्या मुजोर प्रशासनाला जाब कोणी विचारायचा ? जर शेतकरी पुत्र शांततेच्या लोकशाहीच्या मार्गाने अमरण उपोषण करून न्यायासाठी तहसीलदारांना साकडे घालत असतील तरीही प्रशासन जर त्यांना वेठीस धरत असेल त्यांच्या जीवाशी खेळत असेल तर न्याय मागाचा कोणाकडे ? अशा परिस्थितीमध्ये गेवराई पायाचे सरपंच संघर्ष योद्धा मंगेश साबळे पाटील जर आमरण उपोषणाच्या संदर्भामध्ये निवेदन देण्यासाठी तहसीलदाराच्या कार्यालयात जात असतील तर त्यात चूक कोणती ? खरे गुन्हेगार पंचायत समीती प्रशासन एक तर त्यांनी शेतकऱ्यांच्या वर अन्याय केला भ्रष्टाचाराने बरबटलेल्या अधिकारी शेतकऱ्यांचे कोणतेही काम वेळेवर करत नाहीत. तहसीलदार ऐकून घेत नाहीत शेतकऱ्यांना न्याय देत नाहीत. अशा परिस्थितीमध्ये प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यावर गुन्हे दाखल करण्याची गरज असतांना न्याय मागणारा वरच गुन्हे दाखल करत असतील तर अशा प्रवृत्तीचा जाहीर निषेध करण्याशिवाय कोणता पर्याय उरतो म्हणून अशा भ्रष्ट व नाकर्त्या लोकप्रतिनिधी व मग्रुर कामचुकार प्रशासनाचा त्रिवार जाहीर निषेध!!!

– बोरसे गुरुजी
जिल्हा सचिव
आम आदमी पार्टी जालना.



# भजन आणि भोजन जीवनाचे खरे सूत्र–मनोहर महाराज आळंदीकर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

भजन आणि भोजन हे जीवनाचे खरे सूत्र असून हे सूत्र सर्वांनी अंगीकारावे असे प्रतिपादन प्रसिद्ध भागवत कथाकार मनोहर महाराज आळंदीकर यांनी केले. भगवानगड,कंधार येथे अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथा ज्ञानयज्ञ आयोजीत केले,असून तिसऱ्या दिवशीची कथा सांगताना त्यांनी हे प्रतिपादन केले.ते कथा सांगताना पुढे म्हणाले, संसारातील ताप कमी करण्यासाठी सत्संगाचा मार्ग अवलंबला तर जीवनातील ताण कमी होतो. कधीही भोजन करण्याअगोदर देवाचे नामस्मरण केले तर भोजन शुद्ध होते. म्हणून भजन आणि भोजन जीवनाचे खरे सूत्र आहेत.कथेचे विश्लेषण करताना त्यांनी महाभारतातील उदाहरण देत वाईट प्रवृत्तीचा कसा नाश होतो हे दाखवून देतांना ईश्वर धर्माच्या व सत्याच्या बाजूने कसे उभे राहतात हे महाभारतातील युद्धाचे वेळी भगवान श्रीकृष्ण पांडवाच्या बाजूने उभे राहीले हे पटवून सांगीतले.तसेच राजा परिक्षिताने कलीला स्थान देतांना चोरी, व्यभिचार, जुगार अशा ठिकाणी बसवल्याने या कलियुगात या गोष्टींमुळे संसाराचे वाटोळे होत आहे. त्यामुळे संतांनी सांगीतलेल्या गोष्टींचा आपल्या जीवनात अंगीकार करावा जेणेकरून तुमचे जीवन सफल होईल.हिंदू धर्माबद्दल बोलतांना ते म्हणाले, हिंदू



धर्म हा जगात सर्वश्रेष्ठ धर्म असून येणाऱ्या काळात जगभर हिंदू धर्माचे आचरण होईल हे सांगताना त्यांनी अपत्य वाढवण्याचा सल्ला दिला जेणेकरून ईतर धर्म आपल्यावर आक्रमण करणार नाहीत व आपल्या एकीची बळ सर्वांना दिसून येईल.

ही कथा ऐकण्यासाठी शहरातील महिला वर्गाची उपस्थिती लक्षणीय आहे. यावेळी भगवानबाबा सेवाभावी प्रतिष्ठान व सप्ताह कमीटी भगवानगड कंधार यांच्या वतीने परिसरातील भाविकांनी जास्तीत जास्त संख्येने या कथेचा व किर्तन सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले.

# राष्ट्ररक्षणानंतर वनसंवर्धनाची जबाबदारी:वनपरिक्षेत्र अधिकारी अरुण साबळे यांच्या सेवानिवृत्तीने कर्तव्ययुगाचा शेवट

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बाळासाहेब खेडकर । पाथर्डी**

देशसेवा आणि पर्यावरण संरक्षण या दोन्ही क्षेत्रांत निष्ठेने, शिस्तीने आणि प्रामाणिकपणे सेवा बजावणारे पाथर्डीचे वनपरिक्षेत्र अधिकारी मा. श्री. अरुण नामदेव साबळे हे आज सेवानि वृत्त होत आहेत. त्यांच्या दीर्घ आणि कर्तव्यनिष्ठ सेवाकार्याच्या गौरवार्थ पाथर्डी येथे हॉटेल संस्कृती या ठिकाणी दुपारी १२ वा. सन्मानपूर्वक सेवानिवृत्ती समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

मा. श्री. साबळे यांनी आपल्या सेवाजिवनाची सुरुवात देशाच्या संरक्षण सेवेतून केली. सीमारेषेवर कर्तव्य बजावत त्यांनी राष्ट्रसेवेला आपले पहिले प्राधान्य दिले. त्यानंतर त्यांनी वनविभागात प्रवेश करून वनसंवर्धन, जंगल संरक्षण व पर्यावरण रक्षणाची जबाबदारी समर्थपणे पेलली. देशसेवेनंतर समाज आणि निसर्गासाठी योगदान देण्याचा त्यांचा हा निर्णय अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला.वनविभागातील सेवाकाळात त्यांनी विविध ठिकाणी कार्यरत राहून वनसंपदेचे रक्षण, अवैध वृक्षतोड रोखणे, जंगलातील आगींवर नियंत्रण, वन्यजीव संरक्षण तसेच शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी यामध्ये उल्लेखनीय कामगिरी केली. पाथर्डी वनपरिक्षेत्रात कार्यरत असताना त्यांनी अधिकारी–कर्मचारी आणि स्थानिक नागरिकांमध्ये समन्वय साधत कर्तव्यदक्ष, शिस्तप्रिय व लोकाभिमुख अधिकारी अशी ओळख निर्माण केली.त्यांच्या कार्यशैलीत प्रामाणिकपणा, नियमपालन आणि संवेदनशीलता यांचा सुरेख समतोल दिसून येत होता. शेतकरी, ग्रामस्थ आणि वनविभागातील कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे ते नेहमीच सकारात्मक दृष्टीने पाहत, योग्य मार्गदर्शन करत असत. त्यामुळे वनविभागा बरोबरच सर्वसामान्य नागरिकांमध्येही त्यांच्याविषयी आदरभाव निर्माण झाला.


दीर्घ सेवाकाळात त्यांनी अनेक कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या अनुभवातून घडलेले कर्मचारी आजही त्यांच्या कार्यपद्धतीचा आदर्श घेत



असल्याचे बोलले जात आहे. सेवानिवृत्ती हा एक टप्पा असला तरी त्यांनी निर्माण केलेली मूल्ये, शिस्त आणि सेवाभाव कायम स्मरणात राहणार असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

आज होणाऱ्या सेवानि वृत्ती समारंभास वनविभागातील वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी, विविध विभागांचे प्रतिनिधी, स्थानिक मान्यवर, सहकारी व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. यावेळी त्यांच्या देशसेवा व वनसेवेत दिलेल्या अमूल्य योगदानाबद्दल शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

राष्ट्ररक्षणानंतर निसर्गरक्षणाची जबाबदारी स्वीकारत कर्तव्यभावनेने काम करणारे मा. श्री. अरुण नामदेव साबळे यांची सेवानिवृत्ती म्हणजे केवळ शासकीय सेवेतून निवृत्ती नसून, कर्तव्य, निष्ठा आणि समर्पणाने भरलेल्या एका युगाचा गौरवपूर्ण समारोप असल्याची भावना सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे. सदर कार्यक्रमाचे आयोजन वनपाल बबनराव मंचरे साहेब विजय पालवे ,श्री साळवे, नाईकवाडे साहेब वनरक्षक बाळासाहेब बटुळे ,रामदास शिरसाट व कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी केले आहे.





































हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirkala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933

# अंधाराचा फायदा घेऊन कर्नाटकातून आणत होते प्रतिबंधित गुटखा!

## ग्रामीणच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने दिला त्यांना चांगला झटका

लोकनेता न्यूज नेटवर्क

उदगीर । एल पी उगिले)

आंध्र प्रदेश किंवा कर्नाटकातून महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा आणि सुगंधित तंबाखू रात्रीच्या अंधाराचा गैरफायदा घेऊन गुटखा किंग उदगीर मार्गे इतर जिल्ह्यात आणि परिसरामध्ये पोहोचता करायचे, या अनुषंगाने उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने विशेष लक्ष ठेवून, तसेच या कामी गोपनीय बातमीदार नेमून माहिती मिळवण्याचा प्रयत्न केल्यानंतर त्यांना गोपनीय माहितीदाराकडून मिळालेल्या खात्रीशीर सूचनेचा अंमल करत, डीबी पथकातील पोलीस अंमलदार नामदेव चेवले, राम बनसोडे, राजकुमार डबेटवर, सचिन नाडागुडे, संदीप केंद्रे यांच्या पथकाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यरात्रीच्या सुमारास जवळपास एक वाजण्याच्या दरम्यान बिदर रोड कडून उदगीर कडे येत असताना बिदर गेटच्या जवळ त्यांना उपलब्ध झालेल्या माहितीनुसार महिंद्रा कंपनीची चार चाकी गाडी (क्रमांक एम एच २३ बीसी ३४ ३५) ही येत असताना दिसून आल्यानंतर या पथकाने सदरील गाडीला थांबवून, त्याची तपासणी केली असता, गाडीमध्ये पांढऱ्या छोट्या पोत्यात विमल पान मसाला असे लिहिलेले बावीस पुडे प्रत्येक पुड्याची किंमत १९८ रुपये प्रमाणे ४३५६ रुपयांचा माल तसेच वीं१ तंबाखू असे लिहिलेले २२ पुडे प्रत्येक पुडा २२ रुपये प्रमाणे ४८४ रुपयांचा मुद्देमाल तर दुसऱ्या एका पांढऱ्या पोत्यात डायरेक्टर स्पेशल पान मसाला असे लिहिलेल्या एकूण ६० खपटी बॉक्स एका बॉक्सची किंमत ३६० रुपये असे २१ हजार ६०० रुपये तसेच त्यातच शॉट ९९९ लिहिलेले एकूण ६० खपटी बॉक्स प्रत्येक बॉक्स किंमत १८० रुपये प्रमाणे दहा हजार आठशे रुपये किमतीचे मुद्देमाल आढळून आले. तसेच रुवी तंबाखू असे लिहिलेले २०८ पुडे प्रत्येक पुडा ३० रुपये प्रमाणे ६२४० रुपये, तसेच दुसऱ्या एका पांढऱ्या पोत्यात विमल पान मसाला असे लिहिलेले २०८ पुडे प्रत्येकी किंमत १२० रुपये प्रमाणे २४ हजार ९६० रुपये आणि अशा पद्धतीच्या महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटखा आणि सुगंधित तंबाखू यांयांची चोरटी वाहतूक करण्यासाठी वापरात आणली गेलेली, महिंद्रा कंपनीची चार चाकी गाडी जुनी वापरात असलेली अंदाजे किंमत सात लाख रुपये असा एकूण सात लाख ६८ हजार ४४० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरील प्रकरणी आरोपी शिवा सोमनाथ स्वामी (वय ३९ वर्ष, व्यवसाय खाजगी नोकरी, रा. वैजनाथ मंदिर जवळ, स्वामी मठ परळी) याच्याविरुद्ध उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशन येथे पोलीस अंमलदार नामदेव चेवले



यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुरंन ७५०/२५ कलम १२३, २२३, २७४, २७५ भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.याप्रकरणी व वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस उपनिरीक्षक राष्ट्रपाल लोखंडे हे अधिक तपास करत आहेत. महाराष्ट्र शासनाच्या वतीने युवा पिढीच्या आरोग्याचा विचार करून कोट्यावधी रुपयांचा कर बुडत असला तरी हरकत नाही, मात्र तरुणांना व्यसनाधीन होण्यापासून परावृत्त करावे, तसेच त्यांना चुकीच्या सवयी लागू नयेत. या उद्देशाने महाराष्ट्रा मधून गुटखा निर्मिती, वाहतूक आणि विक्री याच्यावर प्रतिबंध लादण्यात आले. असे असले तरीही शेजारच्या राज्यामध्ये तशा पद्धतीचे प्रतिबंध नसल्यामुळे त्या राज्यात उत्पादन झालेला गुटखा जो की महाराष्ट्र राज्यामध्ये विक्रीसाठी बंदी आहे, असा गुटखा स्वतःच्या फायद्यासाठी काही गुटखा किंग रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन कर्नाटकातून महाराष्ट्रातील सीमा भागातून महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांमध्ये तो गुटखा आणि सुगंधित तंबाखू पोहोचता करतात. या अनुषंगाने अनेक वेळा प्रसिद्धी माध्यमातून ओरड करण्यात येत होती.अजूनही अनेक पानपट्ट्यावरून खुलेआम असा प्रतिबंधित करण्यात आलेला गुटखा उपलब्ध होत असल्याबाबत तंबाखू प्रेमी बोलत असतात. यासंदर्भामध्ये जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, उदगीर उपविभागाचे पोलीस अधिकारी गजानन भातलवंडे आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी यांनी आपल्या गुन्हे प्रकटीकरण शाखेला वेळोवेळी सूचना केल्या होत्या. त्या सूचनांची अंमलबजावणी करत महाराष्ट्र आणि कर्नाटकाच्या सीमा भागातून येणाऱ्या वाहनांची कसून तपासणी करण्याची मोहीम गुन्हे प्रकटीकरण शाखेने हाती घेतली होती. त्याच मोहिमेमध्ये तब्बल सात लाख ६८ हजार ४४० रुपये एवढा मुद्देमाल पोलिसांच्या हाती लागला आहे. गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या वतीने मोठ्या जिद्दीने केलेली ही कारवाई उदगीर परिसरामध्ये कौतुकाची ठरत आहे. गुटखा पकडला असला तरी मटका मात्र मोठ्या धुमधडाक्यात चालू असल्याची तक्रार अजूनही चालू आहे.

उदगीर ग्रामीण पोलिसांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली केलेली ही कारवाई निश्चितच कौतुकास्पद असून जनतेतून पोलिसांचे कौतुक होत आहे.

# शिक्षक व पालक मेळावा उत्साहात संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

हदगांव । चंद्रकांत भोरे

श्री.साईबाबा निवासी दिव्यांग विद्यालय

हदगाव ,सम्राट अशोक निवासी मतिमंद विद्यालय हदगाव व निवासी मूकबधिर विद्यालय हदगाव जिल्हा नांदेड या तिन्ही शाळेच्या वतीने संयुक्तपणे ३० डिसेंबर २०२५ रोजी शिक्षक व पालक मेळाव्याचे आयोजन विद्यालयांच्या प्रागणात करण्यात आले होते. कार्यक्रमाकरिता विशेष प्रमुख अतिथी म्हणून माननीय श्री अविनाश देवसटवार (प्रादेशिक उपायुक्त ) प्रादेशिक उपायुक्त कार्यालय लातूर, यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच संस्थेचे अध्यक्ष माननीय डॉक्टर प्राचार्य वसीययोद्दीन मुजावर सर, माननीय श्री डॉक्टर प्राचार्य नागनाथ पाटील, तसेच माननीय श्री बालाजी ईबितदार ,व माननीय श्री गजानन मुधोळ पाटील या सर्वांची विशेष उपस्थिती लाभली.या मेळाव्यातून पालक जागृती चे महत्व समजावुन सांगितले चांगला नागरिक घडवण्याचे आजचे आव्हान असून यासाठी शाळा आणि पालक यांच्यात समन्वय आवश्यक आहे. मुलांच्या शिक्षणामध्ये सक्रियपणे सहभागी व्हावे हा मेळावा शिक्षक व पालकांमधील संवाद वाढवण्यासाठी चा एक उत्तम मंच ठरला भविष्यात मुलांच्या उज्वल भविष्यासाठी एकत्रितपणे काम करण्याचा मानस सर्व पालकांनी व्यक्त केला सदरील कार्यक्रमासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आल्या होत्या सर्व समिती प्रमुखांचे शब्द सुमनाने स्वागत करून त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.तसेच तिन्ही शाळेतील मुख्याध्यापक श्री .एस. बी पालेकर, श्री.व्ही एस खाकरे, व श्री. जी बी. मोरे उपस्थित होते व कार्यक्रमाचे सुंदर असे सूत्रसंचलन श्री. भास्कर देवसरकर सर व सौ.सारिका जाधव मॅडम यांनी केले. सर्व पालकांनी सुरुची भोजनाचा आस्वाद घेतला.सदरील कार्यक्रमाकरिता तिन्ही विद्यालयाचे मुख्याध्यापक व सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते.





# नायगाव तालुक्यात वेगवेगळ्या शेत बांधावर कृषी विभागाच्या पथकाने दिली भेट

## प्रगतिशील शेतकरी माधव चव्हाण यांच्या फळबागेला कृषीचे चर्चा सत्र



लोकनेता न्यूज नेटवर्क

नायगाव । प्रतिनीधी

जिल्हा मासिक चर्चासत्राच्या अनुषंगाने कृषी विभागाच्या वतीने नायगाव तालुक्यात एक दिवसीय चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते यावेळी कृषीच्या पथकाने विविध ठिकानी शेतींना भेटी देऊन नायगाव शहरातील प्रगतिशील शेतकरी माधव व्यंकटराव चव्हाण यांच्या शेतातील फळबागेची पाहणी करून चर्चा सत्र घडवून आणले.कृषी विभागाच्या वतीने जिल्हा मासिक चर्चासत्राच्या अंतर्गत प्रत्येक महिण्यात एका तालुक्यात एक दिवसीय चर्चा सत्राचे आयोजन केल्या जाते याच अणुषंगाने दि ३० डिसेंबर रोजी नायगाव तालुक्यातील विविध ठिकानी कृषीच्या पथकाने शेतकर्यांच्या शेतीला भेट देऊन मार्गदर्शन केले,टाकळगाव येथील नर्सरी ,देगाव येथे टोमॅटो उत्पादक शेतकर्यांच्या शेतीला भेट दिल्यानंतर नायगाव शहरातील प्रगतिशील शेतकरी माधव व्यंकटराव चव्हाण यांच्या अंबा फळबाग या बागेची पाहणी करून योग्य मार्गदर्शक केले माधव चव्हाण यांनी दोन वर्षापुर्वी भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेतुन केशर अंब्याची लागवड केली होती मुबलक पाणी,ठिबक, देखरेख व संगोपनामुळे चव्हाण यांचे बाग बहरले,यावेळी उपजिल्हा कृषी अधिकारी विठ्ठलराव गीते यांनी महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या विविध योजनांचा शेतकर्यांनी लाभ घेण्याचे आव्हान केले तसेच कृषी विभागामार्फत फळबाग लागवड करण्यासाठी भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना,नानाजी देशमुख कृषी संजवणी योजना,महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनतूनही फळबाग लागवड करण्यात येते असी माहिती दिली,पिकांवरील अडिअडचनी व शेतकर्यांना मार्गदर्शन करण्यासाठी कृषी विभागाचा हा पाहणी दौरा होता या पाहणी दौर्यात उपजिल्हा कृषी अधिकारी विठ्ठलराव गीते देगलूर,तालुका कृषी अधिकारी दिपेश देवरे,मंडळ अधिकारी बच्चेवार,सुपर वायजर बालाप्रसाद चव्हाण,कृषी साहाय्यक मुगावकर मॅडम,यासह कृषी विभागाचे जिल्ह्याचे अधिकारी व सर्व कर्मचारी होते.

# श्रीपतराव कदम महाविद्यालय शिरवळ येथे अर्थशास्त्र विभागातर्फे डिजिटल लिटरशी कोर्सचे उदघाटन संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

शिरवळ । विजय जगताप

रयत शिक्षण संस्थेचे , श्रीपतराव कदम महाविद्यालय शिरवळ येथे अर्थशास्त्र विभाग व सेवा सहयोग फौंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने डिजिटल कोर्सचे उदघाटन करण्यात आले. प्रमुख पाहुणे मा. राहूल शेलार हे होते. हा कार्यक्रम अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.उध्दव घोडे यांनी आयोजित केला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. मोहन राजमाने हे होते. प्रमुख म्हणून पराग कदम,यश शेलार,विशाल थिटे आदि व्यासपीठावर उपस्थित होते. या कार्यक्रमात बोलत असताना राहूल शेलार म्हणाले आता संगणकयुग सुरू झालेले आहे. विद्यार्थी दशेत असताना संगणक ज्ञान मिळवणे महत्वाचे आहे. डिजिटल लिटरशी हा कोर्स म्हणजे मोबाईल वापरून इंटरनेटद्वारे माहिती शोधणे इतरांशी संवाद साधणे सरकारी योजना अशी डिजिटली कौशल्ये शिकवणारा हा कोर्स आहे.आपल्या सुरक्षिततेवर लक्ष केंद्रित करून शिक्षण आणि करिअर तसेच दैनंदिन जीवनासाठी आवश्यक गोष्टी या कोर्स द्वारे शिकविल्या जातात असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने म्हणाले आजच्या काळामध्ये दूरच्या प्रवासास निघाले असताना ऑनलाईन पेमेंट अतिशय महत्वाचे आहे. सायबर गुन्ह्यांचे प्रकार वाढलेले आहेत. स्व:ताजवळ पैसे ठेवणे धोक्याचे आहे.या कोर्स द्वारे ईमेल सोशल मिडिया व्हीडीओ कॉन्फरन्स, प्रभावी संवाद साधणे, डिजिटल आर्थिक साक्षरता , डिजिटल पेमेंट, ऑनलाईन बँकिंग अशा सुविधा या कोर्स द्वारे शिकवल्या जातात. आपले महाविद्यालय ग्रामीण भागातील आहे. आपला विद्यार्थी संगणक साक्षर बनून गुणवत्तापूर्ण पुढे जावा म्हणून हा कोर्स सुरू केलेला आहे असे ते म्हणाले.या कार्यक्रमाचे प्रास्तावित डॉ. उध्दव घोडके यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रविंद्र जाधव यांनी केले.आभार प्रा. तानाजी भोसले यांनी मानले. या कार्यक्रमास शिक्षक व शिक्षकेतर सेवक बहुसंख्येने उपस्थित होते.

# वीज कंत्राटी कामगारांचा ऐतिहासिक विजय मेळावा पुण्यात उत्साहात संपन्न

## रायगड जिल्ह्यातील कर्मचारी विजय मेळाव्यात सहभागी

लोकनेता न्यूज नेटवर्क

उरण । विठ्ठल ममताबादे

महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ (संलग्न : भारतीय मजदूर संघ) यांच्या वतीने वीज कंत्राटी कामगारांचा भव्य विजय मेळावा पुणे येथे मोठ्या उत्साहात पार पडला. ठाणे औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या ऐतिहासिक निकालानुसार २२८५ वीज कंत्राटी कामगारांना कायम करण्याचा निर्णय झाल्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित या मेळाव्यास राज्यभरातून सुमारे ११६७ वीज कंत्राटी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.या मेळाव्यात रायगड जिल्ह्यातील कर्मचारी सुद्धा मोठया संख्येने उपस्थित होते.

या वेळी भारतीय मजदूर संघाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अनिल ढुमणे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, हा निकाल कंत्राटी कामगारांच्या हक्कांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असून संपूर्ण देशातील कंत्राटी कामगारांसाठी दिलासादायक ठरणारा आहे.वीज कंत्राटी कामगार संघाने रस्त्यावर उतरून केलेली आंदोलने, पुणे–मुंबई पायी मोर्चा, मंत्रालयावर धडक मोर्चा, नागपूर येथे धडक मोर्चा तसेच संविधान चौकातील उपोषण या संघर्षांची त्यांनी विशेष दखल घेतली. यापुढे विविध उद्योगांतील कंत्राटी व असंघटित कामगारांना लेबर कोडमधील लाभ मिळवून देण्यासाठी संघटनेने अधिक प्रभावी प्रयत्न करावेत असे आवाहन त्यांनी केले.

ज्येष्ठ मार्गदर्शक अण्णाजी देसाई यांनी वीज उद्योगातील दीर्घकालीन कामगार चळवळीचा आढावा घेत कंत्राटी कामगारांसाठी संघटनेने मिळवलेली २०% व १९% वेतनवाढ तसेच नोकरी सुरक्षा (जॉब सेक्युरिटी ) संदर्भातील प्रयत्न महत्त्वपूर्ण असल्याचे नमूद केले आणि शासनाकडून यावर सकारात्मक निर्णय अपेक्षित असल्याचे मत व्यक्त केले.या मेळाव्यास भारतीय मजदूर संघाचे प्रदेश अध्यक्ष अनिल ढुमणे, ज्येष्ठ मार्गदर्शक अण्णाजी देसाई व ज्येष्ठ वकील विजय वैद्य हे प्रमुख वक्ते होते.राज्यसभा खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांनी उपस्थित राहून कामगारांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या तसेच ऊर्जामंत्री मा. ना. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे कामगारांच्या उर्वरित प्रश्नांबाबत पाठपुरावा करून न्याय मिळवून देण्याचा निर्धार व्यक्त केला.महिला पदाधिकारी श्रीमती बेबी राणी डे व ज्योती कदम यांनी मेधाताईंचे स्वागत केले.संघटनेचे माजी अध्यक्ष व मान्यवर शरद संत, श्रीपाद कुटासकर, सुभाष सावजी, धनंजय इनामदार, विजय मुळगुंद, आप्पा जाधव, अनंतराव मोडक, अण्णासाहेब धुमाळ, बाळासाहेब कांबळे, अर्जुन चव्हाण तसेच सर्व साक्षीदारांचा संघटनेतर्फे सत्कार करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.या मेळाव्यात संघटनेचे , अध्यक्ष निलेश खरात,कार्याध्यक्ष अमर लोहार,सरचिटणीस सचिन मेंगाळे,उपसरचिटणीस राहुल बोडके,संघटनमंत्री उमेश आणेराव,कोषाध्यक्ष सागर पवार यांनी संघटनेची आगामी दिशा व भूमिका स्पष्ट केली.१३ वर्षांचा हा संघर्ष अत्यंत कठीण असला तरी जिद्द, चिकाटी व सातत्यामुळे हे सामूहिक यश मिळाले आहे. वीज कामगारांच्या न्याय्य मागण्यांसाठी येत्या काळात राज्यव्यापी आंदोलन अधिक व्यापक स्वरूपात छेडण्याचा ठराव मेळाव्यात एकमताने मंजूर करण्यात आला.हा मेळावा यशस्वी करण्यासाठी पुणे येथील संघटनेचे पदाधिकारी सुमीत कांबळे, निखिल टेकवडे, मार्गदीप मस्के , प्रवीण पवार, त्यांच्या पूर्ण टीम ने मोलाचे योगदान दिले.

